**रे.दि.मु.क्र.४७/२०२१**
(यशवंत वि. मनोहर)

**आदेश नि.५४ खाली**
(आदेश पारीत दि.१४/०६/२०२४)

सदरचा अर्ज वादी क्र.१अ यांनी वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

**वादी वारस क्र.१अ चे कथन –**

२. दावा हा प्रस्तुतचा दावा त्यांचे मुखत्यारामार्फत दावा मिळकतीचे वाटप करुन मिळणेसाठी व हक्क ठरावासाठी दाखल केला आहे. वादी यशवंत भागोजी हळदे हे दि.१५/०२/२०२३ रोजी मिरज येथे मयत झालेले आहेत. अर्जातील नमुद वारस क्र.१अ ते १ड हे वादीचे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे व्यतिरिक्त मयत वादीस अन्य कोणीही वारस नाहीत. सबब अर्जामधील नमुद वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

**प्रतिवादी क्र.१३,१५,२०,२३ ते २५,२७ व ३० तर्फे म्हणणे–**

३. सदर प्रतिवादींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश करणेची विनंती केली आहे.

४. अर्जाचे, म्हणण्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३** अन्वये दावा दाखल करण्याचा अथवा एखादया व्यक्ती विरुध्द अंतिम अनुतोष मागण्याचा अधिकार एखादया वयक्तीचा मृत्यु झाल्यानंतर त्याचे वारसांना राहत असेल तर सदर कामी त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे उचित राहिल असे नमुद केलेले आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत दाव्यातील वादी यशवंत भागोजी हळदे हे दि.१५/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदरची बाब दर्शविण्यासाठी नि.५७/१ च्या यादीसोबत त्यांचा मृत्यु दाखला देखील हजर केलेला आहे. तसेच अर्जामधील नमुद व्यक्ती या वादीस वारस आहेत याचे सत्यतेसाठी वादीने याकामी प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादीने देखील याबाबत कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही.

७. याकामी नि.५० व ५२ कडे पारीत केलेल्या आदेशाप्रामणे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब व दावा अवसान रद्द करण्यात आलेले आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज देखील वादीवर योग्य तो खर्च लादून मंजूर करणे उचित राहिल. सबब वर नमुद कारणांचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीचे अर्जामधील नमुद वारस अभिलेखावर घेण्यास वादी वारस क्र.१अ यांनी प्रतिवादी क्र.१३,१५,२०,२३ ते २५,२७ व ३० यांना एकत्रीतरित्या रक्कम रु.१०००/- खर्च म्हणून देण्याचे अटीवर परवानगी देण्यात येते.

३. सदर आदेशाची पुर्तता वादीने पुढील तारखेस करावी.

४. सदर आदेशाची नोंद उभय पक्षकारांनी घ्यावी.

दिनांक १४/०६/२०२४.

(एम.आर. काळे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, चिपळूण.